# IJ MATTERS

SHRINE OF THE INFANT JESUS

**Nashik India: Volume III Issue 1 – January 2024**


# CONTENTS


| SR NO | TOPIC | PAGES | AUTHOR |
|---|---|---|---|
| I | SHRINE HAPPENINGS | 3-5 | ERROL |
| II | NATIONAL PRIDE | 6 | GODFREY |
| III | TURN YOUR WORRIES INTO PRAYERS | 7-9 | TERRY |
| IV | CARING FOR THE NATION | 10 | GODFREY |
| V | FLAUNT IT | 11-13 | TERRY |
| VI | BLINDING LIGHT OF CHRIST | 14-15 | VINAY |
| VII | BLOOD ON OUR HANDS | 16 | GODFREY |
| VIII | 26 जाने. प्रजासत्ताक दिन विशेष !! | 17-18 | वेन्सी डिमेलो. |
| IX | शीर्षक:- ख्रिस्त ऐक्य आठवडा | 19-20 | ऑगस्टिन डिमेलो. |
| X | अयोध्या मंदिर विशेष... काल्पनिक काव्य की सत्य... !! | 21-23 | वेन्सी डिमेलो. |
| XI | माझ्या या सहिष्णु देशात....प्रकाशनपूर्व परिचय !! | 24-25 | मीना बनसोडे. |
| XII | मी समाजवादी का आहे !! | 26-27 | वेन्सी डिमेलो. |
| XIII | LENTEN RETREAT FOR THE LAITY IN MARCH 2024 | 28 | ERROL |

# SHRINE HAPPENINGS IN JANUARY 2024

The month of January is a wonderful month. Not only does it begin a New Year, it also allows each one of us to begin anew. It reminds us that the old is gone. It is over. The mistakes of the past have been forgiven. We are loved. It motivates to learn from but not regret the past. It challenges to a bright future by doing our best in the present.

We were extremely busy during the month of January at the Shrine and in the school.
Fr. Errol ended 2023 and began 2024 by giving a Retreat to 6 Jesuits scholastics who will be ordained Deacons in February 2024. All of us could feel the effect of your invaluable prayers.




An employee named Sunny Kurle of Suyog Enterprises - whom we are have hired for the cleanliness of the Shrine area – got a better offer in Pune and decided to accept that. We had a sendoff party for him on December 30, 2023, and prayed for success in his new job. We also gave him a token of our appreciation.



Fr. Vinay Kantela, the youngest member of our Jesuit community celebrated his birthday on January 1. We had a small celebration with all the employees of the Shrine and asked for God's blessings on him. Vinay teaches English literature in Panchvati College and is engaged in inter-religious dialogue within his ministry of teaching. He is much appreciated by his colleagues and students for his way of proceeding.



On January 8 and 11, 2024, two inspectors from the ICSE visited our school in connection with the grant for Provisional Affiliation. They were very impressed with what they saw and experienced and we hope that we will receive the Provisional Affiliation soon.

From January 26-28, 204 we had the fourth Laity Retreat. 64 youth, women and men participated. The feedback we received made it clear that it was a deeply spiritual experience. The personable nature of William Moses, the administrator of the Pilgrim House and the delicious food provided by the canteen was an added bonus. Some of the comments of the participants were: "I will tell as many of my friends about this Retreat because it was so enriching for me and I know it will be the same for them." The content of the sessions was deep and spiritual". "The linking of spirituality with life was so very good". "I never knew that the scriptures could be so interesting". "The Rosary to St. Joseph was a wonderful novelty".




I take this opportunity to wish you all a very happy feast of the Infant Jesus.
May God be with you and your families; may the Infant Jesus bless you all and may Joseph and Mary always intercede.

Fr. Errol Fernandes SJ
Chaplain
Shrine of the Infant Jesus,
Nashik 422101
January 2024

National Pride – Godfrey D'lima SJ

May we all share in a nation
Where the peace is just and true
Where the widow and the orphan
Eat as well as me and you
Where the village has fresh water
Just as good as rich estates
Where all can learn and prosper
And no wealth can shut the gates
Where our neighbours trust our welcome
When no armies war and die
When the roads run far and safely
To the ends of earth and sky



Photo: Kevin d'cruz




WORRIES INTO PRAYERS

Like most others, I too have occasionally been through agonizing, torture times.

I have won prizes for acting… so I can generally cover up and no one can even guess.

I didn't talk about these to anyone… couldn't talk to anyone.

And I have felt helpless and afraid about how it would all end.

Recently, while going through a very distressing month of this, I picked up something that turned things around completely. It was a paraphrased line from the Bible.

breathless halt

brief respite

sit down, lean back,

rest recover

wonder the journey done

worry the journey ahead

where will it all end

when will it all end

sunlight shadow trails

grass strewn patch paths

clear unclear uncertain

doubts anxieties worries

unsettled rest

unsatisfying answers

elusive peace

haunting banshee within

relentlessly tirelessly

gut wrenching …

at panic edge a whisper breeze

turn your worries into prayers

this too shall pass

all will be well…

all will be well…

all will be well…

terryq: april 2017

That is a really comforting thought and I have ample personal proof that it happens.

Sometimes it takes a bit longer but it happens. Again and yet again. All will be well…

And by turning my worries into prayers I can deal with the rough and tumble of difficult times that life brings my way.

You do that too.

And you have the prayers of so many others adding to yours for greater effect.

All will be well for you.

This is not a wish. It is a prophecy.

Take care. Stay well.

Turn your worries into prayers.

Terry Quadros s.j.

# CARING FOR THE NATION

Godfrey D’lima

Who will care for the fields and the forests
Who will save our rivers and streams
Who will thank for the sun shining brightly
Bringing life in the warmth of its beams
Who’ll nurture our animals and insects
Or garden the creepers and trees
Protecting the fish and the reptile
And the plants growing deep in the seas



Who feels for the labourer’s toiling
And the peasant who prays for the rain
For the woman far-trudging for water
For the scavenger’s danger and pain

The choice is all ours to help or ignore
Our nation’s vast peoples that strive
Our future is now and everywhere here
If our care for this Land comes alive

# FLAUNT IT!

Thought for the rest of your life!




Photo/quote: terryq

Under the glass of my table-top in the counselling centre was this quote that I ask students and others who are high on inferiority complex and low on self-esteem to read.

**Our deepest fear is not that we are inadequate.**

**Our deepest fear is that we are powerful beyond measure!**

**It is our light, not our darkness, that most frightens us.**

**We may ask ourselves:**

**“Who am I to be brilliant, gorgeous, talented and fabulous?”**

**Actually, who are you not to be?**

**You are a child of God.**

**Your playing small does not serve the world.**

**There is nothing enlightened about shrinking**

**so that other people won’t feel insecure about you.**

**We are born to make manifest**

**the glory of God that is within us.**

**It is not just in some of us; it is in everyone.**

**And as we let our light shine,**

**we unconsciously give other people**

**permission to do the same.**

**As we are liberated from our own fear,**

**our presence automatically liberates others.**

Nelson Mandela

Inaugural speech, 1994

Once they have read it there is an acknowledging nod as if a way is seen about how the low self-esteem could be dealt with.

More encouragement from me and they move on.

I do not know how successful they are in dealing with their particular difficulty but I send with them a hope and a prayer that they will grow in confidence and soon become the beautiful people they are capable of becoming.

For many years of my life, I myself went through feelings of inadequacy and not being able to measure up to expectations – my own or those of others. I remember a very good Jesuit superior telling me to take off the sun-glasses through which I used to look at myself. And many others told me that I had a lot of potential and was not using much of it.

But all that is history.

It wasn't Nelson Mandela's quote that liberated me. I do not remember what did, but just now I am confident and quite a show-off about the many talents and qualities I have.

And because I myself have been there, I am committed to help others become confident, develop, and show off the richness and talents that they themselves have.

Good work to be doing and I am glad that I do it.

There I go... showing off again!

# Blinding Light of Christ: A Journey from Persecutor to Apostle

**By Fr. Kantela Vinay C**

The conversion of St. Paul, also known as the Apostle Paul or Saul of Tarsus, is a profound and transformative event in the history of Christianity. This extraordinary journey from persecutor to apostle shaped the course of early Christianity and left an indelible mark on the spread of the Christian faith. In the early years of the Christian movement, Saul of Tarsus was a zealous Pharisee and a fierce persecutor of the followers of Jesus. He played a significant role in the persecution of early Christians, approving of the stoning of Stephen, the first Christian martyr. Saul's mission was to eradicate what he perceived as a threat to Judaism posed by the followers of Jesus.

The pivotal moment in Saul's life occurred on the road to Damascus. According to the biblical accounts in the Book of Acts, Saul was traveling to Damascus with the intention of arresting and bringing back any followers of Jesus he found there. However, a blinding light from heaven suddenly surrounded him, and he heard a voice saying, "Saul, Saul, why are you persecuting me?" This encounter left him blinded and humbled. Stricken with blindness, Saul was led into Damascus by his companions. He spent three days in darkness, fasting and praying. During this time, he received a vision from a disciple named Ananias, who was initially reluctant to approach Saul due to his notorious reputation. However, Ananias, guided by divine intervention, laid hands on Saul, and something like scales fell from his eyes. Saul regained his sight, and in that transformative moment, he became a believer in Jesus Christ.



Following his conversion, Saul, who later became known as Paul, dedicated his life to spreading the teachings of Jesus Christ. The man who once persecuted Christians became one of the most influential figures in the early Christian church. Paul's missionary journeys took him throughout the Roman Empire, where he established Christian communities and wrote numerous letters, which are now part of the New Testament.

St. Paul's conversion is a testament to the transformative power of faith. His life story illustrates the possibility of redemption and the capacity for profound change. The Apostle Paul's writings, including his letters to various early Christian communities, continue to be a source of inspiration and guidance for Christians around the world. The conversion of St. Paul stands as a testament to the unexpected ways in which faith can transform an individual's life. From a fervent persecutor to a devoted apostle, Paul's journey on the road to Damascus is a compelling narrative that has resonated through the centuries. His legacy endures not only in the pages of the New Testament but also in the hearts of countless believers who find inspiration in his remarkable transformation.

# BLOOD ON OUR HANDS

Blood upon many hands today
Pained blood staining our hands
From rioting hordes to nuclear wars
Blood marks the soul of our lands

We’re killing for culture, creed and class
Gloating in national wealth
We’ll shred out the earth, polluting far space
Impoverish the masses by stealth

Left without vision on hollow’d out mission
Indifferent to causes that matter
Making the rounds of nations that relish
Crass hypocritical chatter

Rise, it’s time now, to free from the past
The moment to rein in the beast
Tend the earth’s wounds, build a new world
Where everyone’s part of the feast

26 जाने.
प्रजासत्ताक दिन विशेष !!
(हक्क आणि कर्तव्य)
.... वेन्सी डिमेलो.

भारतीय संविधानाने आपणास घटनेच्या प्रत्येक पानापानांवर सवलती आणि आरक्षणे मिळविण्याबाबतचे हक्क आणि अधिकार दिले आहेत. मात्र ते अधिकार देताना इथे "कर्तव्ये" गृहीत धरली आहेत काय?"
सवलतीसाठी आणि सर्वकाही मोफत तसेच आरक्षणासाठी आज जो देशात, राज्यांत आगडोंब उसळला आहे त्या निमित्ताने ह्यावर चिंतन होणे, देशात चर्चा होणे आज गरजेचे नि आवश्यक झाले आहे.

"शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा !!"
हा मंत्र जपताना बाबासाहेब आंबेडकरानी आपल्या भारतीय अनुयायांना ह्या मंत्रा सोबतच आपणा सर्व नागरिकांना शिकताना, संघटीत होताना आणि संघर्ष करुन आपले हक्क मागताना आपापली कर्तव्यही जबाबदारीने जगा, जपा आणि पार पाडा ती विसरू नका. तरच तुम्ही आपला देश पुढे घेऊन जाल. तरच देशाचा विकास होईल. हेही तेव्हढ्याच पोटतिडकीने, सल्याने आपुलकीने आणि आवेशपूर्णरीत्या सांगितले आहे.

भारतीय वर्ण, वर्ग जाती धर्म आदि व्यवस्था रचनेमुळे देशांतील काहींच्या पदरी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक मागासलेपण आले आहे. अशांच्या उद्धारासाठी भारतीय संविधानानात अभ्यासपूर्वक काही सवलती नमूद केल्या आहेत. त्यातून मागासलेपण दूर होण्यात खूप मदत झाली आहे. पण ह्या सर्व शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक सवलती हक्काने मिळवून देखील आपण कर्तव्याला, आपल्या जबाबदारीला जागत आहोत का ? की फक्त सवलती मिळवत राहिलो. सरकार दरबारी शासनास वेढीस धरून राहिलो. ह्यावर चिंतन होणे गरजेचे आहे. तशा प्रकारचे देशभक्तीचे, देश विकासाचे संस्कार होणे आवश्यक आहे. तरच बाबासाहेबांच्या मनातील बलशाली भारत उभा राहील.

जाॅर्ज फर्नांडिस ह्यांना देशाचे 'संपसम्राट' म्हणून ओळखले जाते. ते कामगारांच्या न्याय हक्कासाठी भांडले. लढले. काही ठिकाणी यशस्वी झाले. कामगारांना चांगले दिवस आले. मात्र त्यांच्या मनात एक सल वेदना कायमची सलतच राहिली. त्यांनी आत्मपरीक्षण केले. पण आता या उपरतीला बराच उशीर झाला होता. ती सल होती.......
"'मी देश घडविण्यासाठी कामगारांना त्यांचे हक्क मिळवून दिले. पण हे सर्व लाभ मिळवून घेऊन ते देश घडविण्यासाठी त्यांच्या कर्तव्याला प्रामाणिकपणे जागले का? हे प्रश्न त्यांना त्यांच्या आयुष्याच्या अंतिम दिवसांत सतावत होते. तसे ते इतर युनियन लिडरांनाही भेडसावत राहिले. आणि भारतीय सर्वेक्षण अंती कळले. त्याचे उत्तर सकारात्मक नव्हते. आपण संघटना, युनियन बांधून हक्क मिळविण्यात यशस्वी झालो असलो तरी देशभक्तीतून देश घडविण्यात, उभारण्यात कमी पडलो. तसे कर्तृत्वाचे संस्कार देण्यात कमी पडलो.

सर्वसाधारणपणे भारतीय मानस "ठेविले अनंते तैसेचि रहावे". किंवा थोड्या थोडक्यात समाधानी असावे. लाभार्थी होऊन पदरात पडेल तेवढे मिळवावे. अशाने देश विकसित होत नसतो. त्यासाठी झिजावे नि लढावे व श्रम,कष्टाने काम करावे लागते हे संस्कार पेरण्यात आपले
अनेक क्षेत्रांतील नेते कमी पडल्याचे दिसतात. सतत मागत राहणे हे अंगवळणी पडल्याने. येथील उद्योगधंदे प्रगत आणि सृजनशील बनलेच नाहीत.
कारखानदारीच्या सततच्या टाळे, संप, मोर्चे, आंदोलने अशामुळे येथे सरकारी, निमसरकारी उद्योग आणि खाजगी कंपन्यांचे मालक आणि त्यांची भांडवलदारीही निरूत्साही बनली.

एके ठिकाणी देशातील शहरी नागरिक, कामगार शिकून, संघटीत होऊन, संघर्ष करून संघटीत झाल्याने त्यांना त्यांचे

हक्क मिळाले. परंतु देशातील
असंघटित शेतकऱ्यांना, छोट्या उद्योगजकांना, तेथील नोकर वर्गाला मात्र तुलनेने सुविधांचे नि सवलतीचे अल्पच हक्क त्यांच्या पदरी पडले. ही असमानताही देशाच्या प्रगतीत खीळ बसवणारी ठरली आहे.

शेतात दिवसरात्र राबणारे हात
आणि शहरी आठ घंटे राबणारे
संघटीत हात ह्यात कमालीची आर्थिक दरी निर्माण झाली. शहरी
गोदी, गिरणी आणि रेल्वे कामगार तर हजेरी लावून इतर खाजगी कामास, इतर कामधंदे करण्यास मोकळे असल्याचीही उदाहरणे आहेत. हक्क मिळवले. पण कर्तव्ये पार पाडली नाहीत.
अशाने देश विकसित होईलच कसा?

भरीस भर म्हणजे देशाच्या सर्वच क्षेत्रात नेत्यांपासून तळापर्यंत वरखाली देश भ्रष्टाचाराने पुरा पोखरला. अशा आजारामुळेही
आणि श्रमप्रतिष्ठेअभावीही आपण देश घडविण्याच्या कर्तव्यास मुकलो आहोत.

अशा वेळी खाजगीकरणाला
आपसुकच आमंत्रण मिळते.
आज रेल्वे, जलवाहतूक, बंदरे
हवाई अड्डे, रस्ते, वीज, पाणी आणि शेती किसानांचेही आज
खाजगीकरण होताना दिसत आहे. आणि अशाला देशात कर्तृत्व जागवणारे विरोधही करताना दिसत नाहीत. खाजगीकरण त्यांना अधिक सुखसोयीचे वाटते. देश अशा खाजगीकरणातूनच विकसित होईल असे पटवून दिले जात आहे. चित्र उभे केले जाते. यशस्वी केले जात आहे. ह्याला कारण सरकारी योजनांतील "हक्क" आपण संघटीत होऊन भांडून, लढून मिळविले. मात्र देशाच्या विकासाचे कर्तव्य बजविण्यात कमी तर पडलो नाहीत ना?

ह्याचे उत्तर दुर्दैवाने होय असेच आहे. आपल्या मागाहून स्वातंत्र्य मिळवून देखील जगातील अनेक
राष्ट्रे आज त्यांच्या देशप्रेमाने, कष्टाने पुढारली आहेत. विकसित झाली आहेत. प्रगती पथावर आहेत. आपण मात्र अजूनही जगातील विकसनशील देशातच गणले जातो आहोत.

शीर्षक:- ख्रिस्त ऐक्य आठवडा

ख्रिश्चन ऐक्याचे महत्त्व, हे एक तत्त्व आहे जे आपल्या विश्वासाच्या केंद्रस्थानी आहे. या ख्रिश्चन युनिटी ऑक्टेव्ह दरम्यान आपण एकत्र येत असताना, आपण ख्रिस्तामध्ये एक शरीर म्हणून एकत्र येण्याच्या गहन महत्त्वावर विचार करूया.

योहानच्या शुभवर्तमानात, येशूने आपल्या अनुयायांच्या एकतेसाठी कळकळीने प्रार्थना केली, "जे लोक त्यांच्या संदेशाद्वारे माझ्यावर विश्वास ठेवतील त्यांच्यासाठीही मी प्रार्थना करतो, की ते सर्व एक व्हावे, पित्या, जसे तू माझ्यामध्ये आहेस आणि मी तुझ्यामध्ये आहे" (जॉन 17:20-21, एनआयव्ही). ही प्रार्थना शतकानुशतके प्रतिध्वनीत आहे, जगभरातील विश्वासणाऱ्यांच्या हृदयात प्रतिध्वनित आहे.

ख्रिस्त ऐक्य सप्ताह आम्हाला सांप्रदायिक सीमा ओलांडण्याची आणि आम्ही ख्रिस्तामध्ये सामायिक असलेले समान बंधन स्वीकारण्याची एक पवित्र संधी प्रदान करतो. ही आत्मनिरीक्षणाची, आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, एकात्मतेबद्दलची आपली वचनबद्धता नूतनीकरण करण्याची वेळ आहे. ऐक्य म्हणजे एकरूपता नाही; उलट, हे देवाच्या राज्याचा उद्देश पूर्ण करण्यासाठी विविध सदस्यांच्या सुसंवादी सहकार्याचे प्रतीक आहे.



इफिस 4:3 मध्ये, प्रेषित पौल आपल्याला "शांतीच्या बंधनातून आत्म्याचे ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करा" असे आवाहन करतो (NIV). कृतीची ही हाक एकता

वाढवण्यासाठी आपण जी सक्रिय भूमिका बजावली पाहिजे त्यावर जोर देते. हे आम्हाला आमच्यातील मतभेद बाजूला ठेवण्याचे, कृपा वाढवण्याचे आणि दुभंगणाऱ्या भिंतींऐवजी एकमेकांना जोडणाऱ्या ब्रिड्स तयार करण्याचे आव्हान देते.

आपण हा सप्ताह साजरा करत असताना, आपण सुरुवातीच्या ख्रिश्चन समुदायांच्या शिकवणींवर विचार करूया, जिथे विश्वासणारे एक मनाचे आणि एका मनाचे होते, त्यांच्याकडे असलेल्या सर्व गोष्टी सामायिक करतात (प्रेषितांची कृत्ये 4:32). त्यांची एकता ही ख्रिस्ताच्या प्रेमाच्या परिवर्तनीय शक्तीचा, अडथळ्यांना तोडून टाकणारी आणि जीवनात परिवर्तन घडवून आणणारा एक शक्तिशाली पुरावा होता.

आजच्या ह्या आधुनिक जगाचे  विभाजन आणि मतभेद हा वैशिष्ट आहे,  म्हणून ख्रिस्त ऐक्य आणि आपली एकता आशेचा किरण आहे. सलोखा, समजूतदारपणा आणि प्रेमाच्या दिशेने मार्ग प्रकाशित करणारे,  आम्हाला मीठ आणि प्रकाश असल्याचे म्हटले जाते. एकत्र काम करून,  आम्ही आमच्या समुदायांसमोरील आव्हानांना तोंड देऊ शकतो, जगाला दाखवून देऊ शकतो की ख्रिस्ताच्या प्रेमाला सीमा नाही.

हा ख्रिस्त ऐक्य सप्ताह आम्हाला सलोख्याचे दूत होण्यासाठी, प्रेम, सहिष्णुता आणि स्वीकृतीची भावना वाढवण्याची प्रेरणा देईल. आपण सक्रियपणे सहकार्य करण्याच्या संधी शोधू या, एकमेकांच्या कल्याणासाठी प्रार्थना करूया आणि एकतेची परिवर्तनीय शक्ती प्रदर्शित करू या.

शेवटी, आपण स्तोत्र 133:1 च्या शब्दांकडे लक्ष देऊ या, "जेव्हा देवाचे लोक एकात्मतेने एकत्र राहतात ते किती चांगले आणि आनंददायी असते!" (NIV). जेव्हा आपण एकतेच्या या प्रवासाला सुरुवात करतो, तेव्हा आपली कृती जगाला साक्ष देणारी, ख्रिस्ताच्या एकात्म प्रेमाची घोषणा करते जी आपल्याला एक शरीर म्हणून एकत्र बांधते.

प्रभु आम्हा सर्वांना आशिर्वादीत करो जेणेकरून आम्ही हे ऐक्य अबाधित ठेवू.

अयोध्या मंदिर विशेष...

कात्पनिक काव्य की सत्य... !!

....वेन्सी डिमेलो.

रामायण महाभारत ही वाल्मिकी व्यास ह्या महान कवींची सुंदर आकर्षक काल्पनिक महाकाव्ये आहेत. त्यात युद्धाची पार्श्वभूमी असल्याने भरपूर संघर्ष आहे. संघर्ष हा साहित्याचा आत्मा असतो. आणि हा संघर्ष त्यात

ठासून भरलेला आहे. त्याचप्रमाणे हे एक 'ॲक्शन एपिक' असल्याने. नैतिक शिकवणूकी सोबत त्यात भरपूर करमणूक मनोरंजनही आहे.

निश्चितच ही शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, संघर्ष, प्रतिके आदिंनी परिपूर्ण भरलेली कलाकृती आहे. ही दोन्ही काल्पनिक अजरामर महाकाव्ये (एपिक) आहेत. भारतीय सारस्वतांच्या दरबारातील महान साहित्य प्रकारात मोडणारे हे साहित्य आहे. हे मान्य करावेच लागेल. त्या ह्या महाकाव्याला शतशः प्रणाम 🙏

मात्र हा बुद्ध ख्रिस्तासारख्यांच्या नैतिक सामाजिक शिकवणूकीचा 'ऐतिहासिक' ऐवज नाही. निश्चितच ह्या काव्यातील पात्रांच्या मुखी मानवी मूल्ये देण्याचा कवीचा प्रयत्न स्तुत्य आहे. महाकवी कालिदासांच्या शाकुंतल महाकाव्या सारखेच ते साहित्यिक दृष्टीने उजवे आहे. मात्र राम, कृष्ण, सीता, राधा, रावण, कौरव पांडव ही पात्रे ह्या भूतलावर होऊन गेली ह्याला ऐतिहासिक पुरावे नाहीत.

ही पात्र सुरेख काव्य कल्पना आहेत. त्यातील जे नाट्य मानवाला जगात नि संसारात नीती नैतिकतेने वागण्याचे धडेही देते. बायबलातील आदाम एवेसारखीच ही काव्यांत रचलेली काल्पनिक पात्रे आहेत.

प्रत्यक्षात कुणी बुद्ध ख्रिस्त गांधी होऊन गेला आणि प्रज्ञा प्राप्त करून मेला किंवा मानवी स्वातंत्र्य लढ्यासाठी वधस्थंभावर मेला वा छातीत बंदुकीच्या गोळ्या झेलल्या असे हे नाही.

हे रामायण महाभारत सारे ह्या महाकवींचा कल्पनाविलास आहे. हे ध्यानात घेऊन त्यांच्या नावे करोडोंची मंदिरे बांधायची की त्यांच्या नैतिक शिकवणूकीवर

समाजमंदिर उभारायची? ही आहे आधुनिक मानवापुढील खरी गोम. कसोटी नि आव्हाने.

मंदिर, मस्जिद, गिरीजा, देऊळ बुद्धविहार गुरूद्वार, मूर्ती, पुतळे उभारण्या शिवायही आपण नैतिकतेचे मानवी जीवन ह्या काव्य पुस्तकातून घडवू शकतो. हे सुज्ञ, मुत्सद्दी राजकारण्यांनाही पक्के ठावूक आहे. मात्र मतपेट्यांसाठी माणसे जमवणे त्यांचा देवदेवतांच्या काल्पनिक शक्तीतून निवडणूक जुमला जुळत असेल. अज्ञानाच्या आनंदातून तसा सोपा सोपान सापडला असेल. तर ते सत्तामत्ता संपत्ती मिळवण्यासाठी विज्ञान विवेकाच्या वाटेला, शोधाला जातीलच कशाला?

रामायणातील नैतिक सत्य सोडून ही मंडळी अज्ञानी आणि सुज्ञ भाविकांसह असे मंदिरातील पूजाअर्चांचे छद्मी प्रयोग करीतच राहतील.... भक्तांना ग्लानी आणून सत्ता मिळवतील. असो सुज्ञास अधिक न सांगणे.

रिडल्स इन हिंदुइझम मधील ग्रंथात "राम आणि कृष्णाचे गौडबंगाल" ह्या विषयावर जेव्हा बाबासाहेब आंबेडकर लिहितात.. तेव्हा ह्या महाकाव्यातील वाल्मिकी, व्यास ह्या महाकवींनी ग्रंथात मांडलेल्या नीतीधर्माविषयीच्या कथांवर त्यांचा आक्षेप नाही. आक्षेप आणि विरोध होता तो जे देव इतिहासात होऊनच गेले नाहीत त्यांना देव करण्याच्या आणि देशात कुपोषित भूकबळी पडत असताना त्यांच्या नावे भव्य सियाराम मंदिरे उभारण्याच्या आग्रहाचा. आणि छद्मी पौराणिक कथा विज्ञान मानणाऱ्यांच्या आणि लादणाऱ्यांच्या त्या अकलेला विरोध होता.

१९८७ च्या दरम्यान रामायण महाभारत ह्या मालिकांनी तर पुरा देश वेठीस धरला होता. वैज्ञानिक दृष्टिकोन सोडून सारे ह्या पौराणिक टिव्ही मालिकांपुढे नतमस्तक झाले होते... त्यावेळी

क्रिकेट सामनेही रद्द करावे लागत होते. इतके महाभयंकर व्यसन देशाला जडले होते.

आज जे छद्मी विज्ञान देशात पेरले जात आहे. त्यांचीच ह्या टिव्ही मालिका म्हणजे प्रचार शुभारंभ होता. हे आता ध्यानात येईल.

तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण ह्यांना आणि काही मराठी विचारवंतांना साहित्यिकांना काळ सोकावत असल्याची धास्ती होती. ही 'हिंदू राष्ट्र' निर्मितीची हलकीशी झुळूक होती. चाहूल होती. हेही ठावूक होते.

ही कर्मठ सनातनींची चाणाक्ष धूर्त चाल लक्षात आली होती. म्हणूनच की काय त्यावेळच्या दूरदृष्टीच्या पुरोगामी शासनाने लोक जन प्रबोधनार्थ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकराचे "राम आणि कृष्णाचे गौड बंगाल" (Riddle of Ram and Krishna.)

ना आदर्श राजा, ना आदर्श पती!! तरी राम पुजनीय कसा? असा सवाल करून हे मूळ इंग्रजी साहित्य मराठीत बाजारात आणले असावे.

आणि त्याकाळी मात्र भावना दुखावल्याच्या कारणावरून समाजात मोठा लोकक्षोभ उसळला होता. जन आंदोलने, कल्लोळ माजला होता. अनेक प्रतिक्रिया उमटल्या होत्या. आंबेडकरांच्या ग्रंथांची होळी करण्यात आली होती. त्याकाळच्या अनेक विद्वानांनी समाजवादी नेते ना.ग.गोरे पासून प्रकाश आंबेडकरापर्यत आणि लोकसत्ताचे माधव गडकरी पासून सर्वच मुख्य वृत्तपत्रांनी दखल घेत साधक बाधक प्रतिक्रिया दिल्या होत्या. त्यात शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते...

"रिडल्स इन हिंदुइसम" ह्यामधील

लिखाण खरोखरच आंबेडकर ह्यांचेच असेल तर मग मात्र डॉक्टर आंबेडकरांबद्धल असलेला आदर नष्ट होण्याची शक्यता आहे".

विचार विवेक सोडून नेतेमंडळी भावनिक बनली की विचारवंतांची कुठलीही चिकित्सा अभ्यास त्यांना नि समाजालाही मान्य करायला कठीण जाते. पक्षीय मतपेटीवाले राजकीय नेते तर अशा वैचारिक संशोधनावर मग सावध प्रतिक्रिया देतात.

हा माननीय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा रामायणावरील व महाभारतावरील चिकित्सक अभ्यास सुज्ञ वाचकासमोर मांडून

धर्मग्रंथ हे पौराणिक काल्पनिक कथा काव्य? की धर्मांधतेच्या निकषांवर केवळ राजकीय सत्ता  उबविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या सध्याच्या भगव्या शासनाचा जुमला हे तपासून आव्हान द्यावे का?

देशाची खरी गरज डावलून देव देवतांच्या नावे भव्य मंदिरे बांधत सुटलेल्या नेत्यांबद्दल हा विचार होणे आज महत्वाचे नि गरजेचे आहे....

😌😌😌😌😌🪔😌😌😌😌😌

माझ्या या सहिष्णु देशात....
प्रकाशनपूर्व परिचय !!
.....मीना बनसोडे.

'माझ्या या सहिष्णु देशात'..... अर्थात 'विवेकाचा जागर' ह्या वेन्सी डिमेलो उर्फ कवी विवेक ह्यांच्या काव्यसंग्रहाचे विमोचन शुक्रवार दिनांक २६ जानेवारी रोजी विश्वमंडळ सेवाश्रम संस्थे तर्फे प्रजासत्ताक दिनी सकाळी 'आनंदसदन' शिरपूर धुळे ह्यांच्या भव्य प्रांगणात संपन्न होणार आहे. त्या प्रकाशना निमित्ताने....

हा संग्रह देशातील सद्यस्थितीवर
भाष्य करणारा आहे. माझ्या भारत देशातील ह्या महान भारतीय सहिष्णु संस्कृतीत देव, देश नि धर्म केवळ सत्तेसाठी कसा वेठीस धरला आहे. वापरला जातो आहे. कसा जुमला नि जुगार खेळून देशाला पणाला लावले आहे. संविधानाला नि सार्वभौमत्वालाच कसा सुरूंग लावला जात आहे. अशा जुलमी सत्येचे व्यंग ह्या कवितांमधून कवीने मांडले आहे.

२०२४ निवडणूकपूर्व हा संग्रह मतदारांनी वाचावा असे हा काव्य संग्रह प्रसिद्ध करण्यामागचा हेतु, प्रयोजन आहे. ह्या काव्यसंग्रहाला प्रसिद्ध कवीव खलील मोमीन ह्यांनी प्रस्तावना लिहिली आहे. हा संग्रह 'निर्भय आंदोलन'चे मनवेल तुस्कानो वसई ह्यांच्या प्रकाशनाने प्रसिद्ध केला आहे. वाचक ह्याचे आवर्जून स्वागत करतील अशी आशा आहे.

गुन्हेगारीची पार्श्वभूमी असलेले
आणि आरोप असलेले दोघे
तडीपार आज धर्माचा आसरा घेऊन त्या आडोशाने ह्या महान देशाचे नेतृत्व करीत आहेत.
आणि भोळी भाबडी भक्त जनता भूलवण्यात ते यशस्वीही ठरत आहेत. आणि स्वताला अशा ह्या आरोपातून तडिपारीतून वाचायचे असेल, त्यातून होणाऱ्या मोठ्या शिक्षेपासून बचाव करायचा असेल तर जुलमी राजवट चालवणे एवढेच एक हुकमी हत्यार दोघांकडे आज तरी शिल्लक आहे.

अशा ह्या योजनेत प्लॅनिंगमध्ये
दुर्दैवाने सर्वच धर्मीचा पुरोहित वर्ग, राजकीय पुढारी वर्ग आणि त्यांची भक्त पिल्लावळ दुर्दैवाने विविध भीतीपोटी अशा जुलमी नेतृत्वाला कुणी इडीच्या भीतीने तर कुणी लाभार्थासाठी साथ देत आहेत. ह्याचे मार्मिक चित्रण ह्या संग्रहात अनुभवयास मिळते.

देशात अशा राजवटीला फक्त केवळ ३५ टक्के मतदारांनी कौल दिला आहे. उरले पासष्ट टक्के
मतदार देशातील विविध पक्षात विखुरले गेले आहेत. त्यांचा लाभ
उठवून धर्मांध सत्ता देशावर गेले एक दशक राज्य करते आहे. हे दुर्दैवी आहे. आणि ही एकाधिकारशाहीची वाटचाल, आणीबाणीसदृश भीती कवी या काव्यसंग्रहात व्यक्त करीत आहे.

या कविता संग्रहाचा विषय धार्मिक, सामाजिक आणि राजकीय जीवनातील व्यंग, विसंगती, दांभिकता, ढोंगीपणा तत्वहिनता, भ्रष्टाचार, दुराचार देशातील अशा क्रूर, अपप्रवृत्ती आदींना केंद्रस्थानी ठेवून लिहिला आहे. 'माझ्या या सहिष्णु देशात.. आणि 'अध्यात्म' या दोन कविता राजनीती आणि धर्मनीतींची व्यंगे दाखविणाऱ्या आहेत. त्या तर आवर्जून अभ्यासायला हव्यात.

संक्रमणशील, संघर्षमय अशा सद्यस्थितीत आपल्या आधुनिक भारत देशात समाजात सहिष्णुता हे जीवनमूल्य सहजीवनमय आणि समाजजीवनासाठी अतिशय महत्वाचे आहे. स्वताच्या धर्मातील आचार विचार व स्वधर्मीय

व्यक्ती यांच्या विषयी जसा आपणास आदर वाटतो तसाच आदर दुसऱ्या धर्मातील आचारविचार व व्यक्तीच्या बाबतीत उक्ती आणि कृती द्वारे प्रकट करणे ही आहे सहिष्णुता...

तीच जर नसेल तर...? किंवा कुणी जाणून बुजून ती नष्ट करू पहात असेल तर...? कवीचा मूळ पिंड हा राजकीय, सामाजिक, धार्मिक असल्याने त्या त्या काळाचे संदर्भ घडामोडीही त्यात डोकावत रहातात. त्यांच्या कवीतेत त्यावर तिरकसपणे चौकस भाष्य पहायला मिळते. एकूणच कवितेत जरी तत्कालीन स्थितीचे भाष्य असले तरी त्यातील आशय हा शाश्वत आहे.

प्रेमळ, समंजस, संवेदनशील, सुहृदस्थ फादर धर्माचे मार्गदर्शक
असल्याने या महान देशाला भूषणावह वाटणाऱ्या संस्कृतीला गालबोट लागेल अशा खालच्या थरावर खेळले जाणारे राजकारण
धर्माच्या मार्गदर्शक तत्त्वाना बगल दिल्याने बोकाळलेल्या चंगळवादावर  इतकेच नव्हे तर मानवजातीला न शोभणाऱ्या वाईट कृत्यांवर विद्रोहाची भाषा
वापरून आगपाखड न करता अत्यंत सौम्य, सभ्य आणि साध्या सरळ शालीन भाषेत सध्याची मानसिकता आपल्या कवितांतून प्रतिबिंबीत करीत आहेत.

आपल्या उपहासगर्भ शैलीतून कवी त्यावर कळस चढवतात.
आणीबाणी काळातील काळरात्री पाडगावकरांनी उपहासात्मक असा 'सलाम' कविता संग्रह लोक जागृतीसाठी प्रसिद्ध केला होता. विवेकाचा हा जागरही आजच्या स्थितीत जन जागृती करील ह्यात संदेह नाही.

पुस्तकासाठी संपर्क:
निर्भय आंदोलन
९३२३१४३६६४
विश्व मंडळ सेवाश्रम
९९२२२००३३०
मीना बनसोडे
९३५६७५९९६१
सिडनी मोरायस
९६०४३८५९८५

मी समाजवादी का आहे !!
... वेन्सी डिमेलो.

सर्वप्रथम हे स्पष्ट असले पाहिजे की समाजवादी असणे हे कुणा संघ वा पक्षाची मक्तेदारी नाही. समाजवादी असणे हे मानवी नि मानवतावादी आहे. उपजत नि स्वाभाविक आहे. अंतर्यामी ज्याच्या प्रेम, दया, क्षमा, सेवा आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, एकता, न्याय ही संविधानिक मूल्ये आहेत.
'जगाला प्रेम अर्पावे' ही आर्जवे आहेत. 'माझ्या आधी दुसरा' ही चारित्र्ये आहेत. 'वैष्णव जन तो तेणे कहिये जो पीड पराई जाने रे'
हे अभंग ज्यांच्या ओठावर नि ओटीपोटात आहेत. 'पर दुःखाने
रडला प्राणी देव प्रकटला त्याच ठिकाणी' ही श्रद्धा आहे. 'जेथे वेदनाव्याकुळ जीव तळमळत असतात तेथेच सेवेद्वारे ईश्वरी
स्पर्श होत असतो' हा विश्वास आहे. तो समाजवादी आहे. ह्या संत मांदियाळीत अनेक संदेष्टे संत महंत साधू आहेत. बुद्ध, ख्रिस्त, गांधी आहेत. गांधी टोपी घालून नि खादी पेहरून जसे गांधी होता येत नाही. तसे केवळ समाजवादी जपतप करून समतावादी होता येत नाही. त्यासाठी तपश्चर्या साधना नि
सेवाधर्म जागवावा लागतो.

गंगा माता आणि यार्देन (जाॅर्डन) नय ज्या हिमालय गंगोत्री आणि गोलानहार्मोन पर्वतराईतून उगम पावतात. तिथले पाणी शुद्ध,शुभ्र पवित्र, नितळ, निखळ, स्फटिका सारखे पारदर्शक असते. पुढे गंगा गंगासागराला आणि यार्देन गालिलीच्या सरोवरातून मृतक्षार सागराला मिळते तेव्हा त्यास
या भूतलावरील मार्गात अनेक अशुद्ध गटारे नि नाले येऊन मिळतात. आणि रामाची गंगा नि ख्रिस्ताची जाॅर्डन मैली होऊन जाते. हे बरेचशे सारे प्रतिकात्मक आहे.

समाजवादी विचारसरणीही तशीच आहे. बुद्धाचा करुणा धम्म. ख्रिस्ताचा सेवाधर्म. महमदाचे बंधुत्व आणि गांधींची अहिंसा चळवळ. आंबेडकरांचे संविधान हे सर्व समाजवादी तत्वाच्या नि मूल्यांच्या पायावर
उभे आहे. आणि आपला देशही
ह्याच सत्याच्या संहितेवर सत्ता चालवतो आहे. मूल्यांवर राज्यकारभार करतो आहे.

मात्र माझ्या ह्या सहिष्णू देशात गांधींविचारापेक्षा कमी मकरंद देणाऱ्या नि अधिक त्रास देणाऱ्या गांधीलमाशाच अधिक तयार होतात. आणि गांधीच्या नावे राजकीय पक्ष चालवतात. तेव्हा त्यातील समाजवादाची घडी विस्कटून गेलेली असते.

तसेच धर्मसंस्थापकांच्या मूळ धर्मात त्यांचे अनुयायी भक्त होऊन कर्मकांडात गुंततात.
तेव्हाही धर्माचा अधर्म होत असतो. आणि त्यातील स्वातंत्र्य, समाजवाद, समता ही मूल्ये गळून पडतात.धर्माच्या नावे बाजार मात्र तेवढा उरतो.

बापूजींनी अंतर्यामी स्वातंत्र्य अनुभवले. जो हे स्वातंत्र्य अनुभवतो तो कधीच कुणाचा गुलाम नसतो. जगातील कुठलाही तुरूंग त्याला बंदिस्त करू शकत नाही. हे जनमनावर नि रयतेवर बिंबविण्यासाठी महात्मा गांधीनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यापुरताच भारतीय काॅग्रेसची स्थापना केली होती. आणि पुढे स्वातंत्र्य प्राप्ती नंतर ती बरखास्त करण्याची विनंतीही केली. कारण पुढे पक्षात सरंजामशाही माजेल ह्या बापूंनी पुढल्या हाका ऐकल्या होत्या. ओळखल्या होत्या. येथे बापूंची दूरदृष्टी दिसून येते.. ह्या काॅग्रेसच्या राजकीय टेकूने पुढे सत्तेसाठी पक्ष स्थापला जाईल. घराणेशाही वाढेल आणि त्यातून
सेवाधर्म कमी आणि सत्ताच अधिक असे होईल. आणि राजनीतीधर्म पाळणाऱ्या बापूंना ते नको होते.

मात्र त्यांच्या अनुयायांनी बापूंच्या नावे आणि त्या भारतीय कॉंग्रेसच्या नावलौकिकावर ह्या देशात सत्तर वर्षे साधक बाधक राज्य केले. सत्ता उपभोगली. ज्यात गांधी, आंबेडकरांचा हा समाजवाद त्यात नव्हता. म्हणून राज्य नि सत्ता हाताळताना त्यात
जनसेवा नि समाज सुधारणे ऐवजी आणि तळागाळात पोहचण्या ऐवजी स्वार्थ, भ्रष्टाचार आणि स्वकेंद्रित अशी ही गटारे बापूंच्या ह्या पवित्र चळवळीला येऊन मिळाली आणि बापूंच्या काळजातील 'राम' मलीन नि विद्रूप झाला. त्यात जातीयवादी, धर्मांध छद्मी सनातनी जन्माच्या पिल्लावळीने शिरकाव केला.
वर शुभ्र टोपी आणि अंतरी भगवी मशाल अशी मंडळी कॉंग्रेसमध्ये शिरून पदावर राहिली. पक्ष आतून पोखरला गेला. आणि देशाचा पूर्ण बट्याबोळ झाला. जे आज आपण भोगतो आहोत.

जगातील प्रत्येक धर्माचीही हीच
गत झाली आहे. मूळ धर्म मलीन
आहे. कर्मकांडात गुंतवला आहे. असे का घडले? तर हे सारे समाजवादा अभावी घडले आहे. आणि समता, बंधुता, एकता, सेवा नि न्यायाअभावी हे सारे अनर्थ घडले आहेत.

शुद्ध विवेक नि
मतीविना
गती गेली.
गती विना रती
रया गेली.
हे एकट्या
समाजवादी
विचारा अभावी
घडले.
देशात नि गावात
आणि
प्रत्येकाच्या
अंतर्यामी हा
समाजवाद वस्तीला
असतो.
त्यातील मीही एक
म्हणून मी
समाजवादी आहे.

**LENTEN RESIDENTIAL RETREAT FOR LAITY**
**AT THE SHRINE OF THE INFANT JESUS, NASHIK ROAD**
**Preacher: Fr. Errol Fernandes SJ**
**Contact 9004617804 or errolsj@gmail.com**



## March 22-24, 2024

**Arrival: March 22, 2024 (evening before supper) Departure: March 24, 2024 (after lunch)**

**Kindly book by the Jan Shatabdi (12071) {Second sitting Rs. 120 and AC Chair Car Rs. 400 – Departure at 12.10 pm from CSMT and 12.25 pm from Dadar} to come to Nashik. Book by Tapovan (17618) from Nashik to CSMT {Second sitting Rs. 90; AC Chair car Rs. 335 – Departure at 6.05 pm from Nashik}**

**Come to me, all you who labour and are heavy burdened, and I will give you rest. (Mt 11:28)**

**Come away to a refreshing and rejuvenating place at the Shrine of the Infant Jesus, Nashik Road, and rest with the Lord**




**Total donation Rs. 1,500 (Rupees One thousand five hundred) for board, lodge and retreat notes. Two will be accommodated in each self-contained room.**

**Contact Fr. Errol 9004617804 or errolsj@gmail.com**